# क्विक हीलचा 'कमवा व शिका' उपक्रम

क्विक हील फाऊंडेशनने तरुणांना सायबर सुरक्षिततेबद्दल प्रशिक्षित करण्यासाठी 'सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा' उपक्रम सुरु केला. विद्यार्थ्यांना या उपक्रमात सहभागी होण्यास प्रेरित करण्यासाठी क्विक हील 'अर्न अॅण्ड लर्न'उपक्रमांतर्गत त्यांना मासिक प्रोत्साहन रक्कम आर्थिक स्वरूपात देणार आहे.

क्विक हील फाऊंडेशन सी.एल. वालिया कॉलेज, डी. वाय पाटील कॉलेज आणि गव्हर्नमेंट इन्स्टिटट्यूट ऑफ फॉरेन्सिक सायन्ससह या विभागांतील २५ संस्थांमधील स्वयंसेवकांची पडताळणी करण्यासोबत त्यांना प्रशिक्षण देत आहे. फाउंडेशन ३,५०० हून अधिक इव्हेण्ट्स राबवण्यासाठी २,५०० हून अधिक शाळा आणि महाविद्यालयांपर्यंत पोहोचेल.

क्विक हील फाऊंडेशनच्या अध्यक्षा अनुपमा काटकर यांनी ही माहिती दिली.